उल्हासनगर महानगरपालिका
ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION
दुरध्वनी क:०२५१– २७२०११९ विस्तार क: २७६ फॅक्स: ०२५१–२७२०१०४

2021-22 Majhi Vasundhara2

NATIONAL CLEAN AIR PROGRAMME

जा.क्र.उमपा/पर्यावरण विभाग/ 265 /2023

दिनांक:- 06/01/2023

# जाहिर आवाहन

याद्वारे उल्हासनगर शहरातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल SUO- MOTO PIL No.०८/२०२० मध्ये दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्लास्टीक/सिन्थेटीक पासून बनविलेल्या नायलॉन मांज्यामुळे पक्षी व मानवी जिवीतास दुखापती होत असल्यामुळे अशा मांज्याचा वापर करू नये. त्याचप्रमाणे आपणांस याद्वारे जाणीवसुध्दा करून देण्यात येत आहे की, नायलॉन मांज्यामुळे विजेच्या तारा तुटून विजपुरवठा खंडीत होणे, विदयुत उपकरणे खराब होणे, अपघात होणे, जिवीताचे नुकसान होणे, पर्यावरणाची हानी होणे इत्यादी बाबी होतात.

तथापि, नागरीकांनी दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजी देशभरात सर्वत्र साजरा केल्या जाणा-या मकरसंक्रात या सणानिमित्त पतंग उडविण्याची प्रथा असली तरी पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी व पक्षी व मानवी जिवीतास दुखापत होवु नये याकरीता पतंग उडविण्यासाठी बाजारात मोठया प्रमाणात उपलब्ध होणा-या नायलॉन मांजाचा वापर करू नये, कोणी वापर करत असतांना आढळल्यास त्यास प्रतिबंद करावा व वापराच्या दुष्परिणामबाबत जनजागृती करावी.

( डॉ. सुभाष् जाधव )
उप-आयुक्त (पर्यावरण)
उल्हासनगर महानगरपालिका